संं.फौ.के.नं. ७५/२०२४

नि. क्र. १८

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – किशोर शिवराम धामापुरकर,

**वय** – ५८ वर्षे, **व्यवसाय** – शिपाई,

**राहणार** – करजुवे, चर्मकारवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरतपास – अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेकडून शपथेवर सुरु –**

**०१**. दि. ०९/०१/२०२४ रोजी मी नोकरीवर शाळेमध्ये होतो. माझे कामाची वेळ सकाळी १०.१५ ते संध्याकाळी ०४.१५ पर्यंत असते. मी दुपारी जेवणासाठी घरी जात होतो. माखजन करजुवे या रस्त्यावर चांदीवडेवाडी हा फाटा आहे तीथे पोलीस ऊभे होते. पोलीसांनी मला पंचनाम्यावर सही करायला सांगीतली. पंचनामा कशासंदर्भात होता मला माहीती नाही. मी न वाचताच सही केली होती. साक्षीदाराला घटनास्थळ पंचनाम्यावरील क्र. ०२ ची सही दाखवण्यात आली. ती त्याने ओळखली. केवळ सहीस ओळखीकरता **नि.१९** देणेत येते. त्या ठिकाणी सुभाष बाबाराम नलावडे हजर होते.

**०२**. साक्षीदाराला पंचनाम्यासोबत जोडलेले एकुण दोन फोटो दाखवले. या फोटोंमध्ये मी दिसून येत आहे.

(**सरकारी वकीलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा का.क. १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आणि फौ.प्र.सं.क. १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पध्दतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.**)

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.03.05 13:10:03 +0530

०३.	हे म्हणणे खरे आहे की, दि. ०९/०१/२०२४ रोजी पोलीसांनी मला अपघाताच्या घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, भागोजी झीमा चांदीवडे यांनी घटनास्थळ आमच्या समक्ष पोलीसांना दाखवले. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ करजुवे ते माखजन जाणा-या आंतरजिल्हा मार्गावर होते.

०४.	हे म्हणणे खरे नाही की, आशिष महेश नलावडे यांनी आमच्या समक्ष अपघातात मयत अपर्णा चांदीवडे हीला तीच्या पॅशन प्रो दुचाकीने ठोकर दिल्याचे सांगीतले. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून पुर्वेस ८० फुट अंतरावर सदरची पॅशन प्रो गाडी क्र. एमएच ०८ एएम ०१८२ ही पुर्वेला तोंड करुन ऊभी होती. हे म्हणणे खरे आहे की, हा पंचनामा माझ्या समक्ष लिहीला आणि माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावर मी वाचून सही केली.

०५.	हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या परीचयाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची याकामी निर्दोष मुक्तता व्हावी अशी माझी ईच्छा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची निर्दोष मुक्तता व्हावी यकरीता पंचनाम्यावर न वाचताच सही केली हे मी खोटे नमुद करत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडून शपथेवर सुरु –</u>**

०६.	माझ्या म्हणण्याप्रमाणे मी ११.०० वा. चे सुमारास जेवायला जात होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळी ११.०० वा. आलो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांच्या विनंतीला मान ठेवून मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, जे काही लिखाण होते ते पोलीसांनी लिहून ठेवले होते.

०७.	हे म्हणणे खरे आहे की, दि. ०८/०१/२०२४ रोजी मी नोकरी करत असलेल्या शाळेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम होता. हे म्हणणे खरे आहे की, शाळा

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.03.05 13:10:08 +0530

करजुवे ते माखजन जाणा–या रस्त्याला डाव्या बाजूला आहे. हे म्हणणे खरे आहे की, चांदीवडे गावाकडे जाणारा रस्ता ऊजव्या बाजूला आहे. हे म्हणणे खरे आहे की, करजुवे ते माखजन जाणा–या अंतर्गत रस्त्यावर अपघातस्थळ डांबरीरोडवर होते. हे म्हणणे खरे आहे की, मृत अपर्णा चांदीवडे या चांदीवडे वाडीच्या रहीवासी होत्या.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.03.05 13:10:13 +0530

**(श्रीमती श्रुती ह. पाटील)**

**दिनांक – ०५/०३/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**